**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा सरतपास शपथेवर फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री. गोरे यांचेमार्फत सुरु**

**०१.** बालाजीने दिलेला मुळ चेक मला दाखवला. तो तोच आहे. बॅकेने न वटल्याचा मेमो दिलेला आहे तो तोच आहे. फिर्यादीने आरोपीला पाठवलेली नोटीसची स्थळ प्रत आता मला दाखवली. ती तिच आहे. नोटीस पोष्टाने पाठवल्याची पावती दाखल केली आहे. सदरची नोटीस आरोपीस मिळाल्याची पोस्टाची पोहोच पावती देखील दाखल केली आहे. आरोपीने माझे नोटीसला वकीलामार्फत उत्तर दिले होते, त्या उत्तराची प्रत मी दाखल केली आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.मेटे यांचेमार्फत शपथेवर सुरु**

**०२.** सन २०१७ मध्ये मी वकीली पदीवीचे शिक्षण घेत होतो. मी बीड येथील विधि महाविदयालयात वकील पदविचे शिक्षण घेतले आहे. मी बी.ए. नंतर विधि पदवीला ॲडमीशन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ ते २०२१ या काळात मी बीड येथेच होतो. मी एलएलबीला सन २०१३ मध्ये प्रवेश घेतला होता. मी अंबाजोगाई वकील संघाचा सदस्य सन २०१७-१८ मध्ये झालो आहे. माझे विधी पदवीचे शिक्षण सन २०१७ मध्ये झाले आहे व माझा विधि पदवीचा परवाना क्र. एमएच २१२५/२०१७ असा आहे. मी जुन २०१७ पासुन वकीली व्यवसाय सुरू केला. मी बीड येथे एलएलबीचे शिक्षण घेत असताना माझा सर्व शिक्षणाचा खर्च ॲडमीशन फीस, परिक्षा फीस असे सर्व खर्च माझे वडील करत असत. वडील मला जाण्यायेण्यासाठी पॉकेट मनी देत होते. हे खरे आहे की, मला उत्पन्नाचे साधन नसल्यानेच माझे वडील माझा सर्व त्यावेळी खर्च करत होते. मी सन २०१७ पासुन ते सन २०२४ साला पर्यंत जुनीयरशिप केलेली आहे. हे खरे आहे की, जुनियरशिपच्या सुरूवातीच्या काळात जुनियर वकीलांना म्हणावे तसे पैसे मिळत नाहीत व तो त्यांचा कसोटीचा काळ असतो. हे खरे आहे की, जुनियरशिपच्या काळात वैयक्तीक खर्च हा घरून पैसे घेवून करावा लागत असे.

**०३.** हे खरे आहे की, मी जो बॅक मेमो दाखल केला आहे त्यावर धनादेश अपु-या रक्क्मेअभावी वटला नाही अशी नोंद नाही. हे खरे आहे की, मी दाखल केलेला चेक हा मायक्रा चेक नाही. हे मला माहीत नाही की, मायक्रा चेक हे सन २०१४ साली व्यवहारात आलेले आहेत. आरोपी हे माझे वडीलांचे मित्र असल्याने त्यामुळे माझी ओळख झालेली आहे. हे खरे आहे की,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.10.10 01:21:53 +0530

आरोपी हा परभणी कृषी विदयापीठ अंतर्गत असलेल्या कृषी महाविदयालयात नोकरी करतात. हे खरे आहे की, त्यांना शासकीय पगार आहे. हे मला माहीत नाही की, आरोपीचे मुले सन २०१७ साली योगेश्वरी महाविदयालय, अंबाजोगाई येथे शिक्षण घेत होते. आरोपीला किती मुले आहेत हे मला सांगता येणार नाही. हे माझे लक्षात नाही की, सन २०२० मध्ये आरोपी हा परभणी कृषी विदयापीठ, परभणी येथील कृषी महाविदयालयात नोकरीस होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ ते सन २०२३ पर्यंत आरोपी परभणी कृषी विदयापीठ येथे नोकरीस होता. हे मला माहीत नाही की, दिनांक ३०.११.२०१७ रोजी आरोपी परभणी कृषी विदयापीठ अंतर्गत येणा-या महाविदयालयात रूजु झाला होता. आरोपीने मला किती तारखेला पैसे मागीतले याचा उल्लेख माझे फिर्यादमध्ये, नोटीसमध्ये व शपथपत्रामध्ये नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सन २०१७ असे नमुद आहे. हे खरे नाही की, एखादया शासकिय कर्मचा-याने पगारपत्र दाखवल्यास पगापत्रकावर कोणतीही बँक कर्ज देते. हे खरे आहे की, एखादया शासकिय कर्मचा-याच्या मुलास शिक्षणाकरीता शैक्षणीक कर्ज देखील बॅका देतात. हे खरे आहे की, आरोपीला मी किती तारखेला पैसे दिले याचा उल्लेख माझे फिर्यादमध्ये, नोटीसमध्ये व शपथपत्रामध्ये नाही. हे खरे आहे की, मला आरोपीने धनादेश कोठे दिला याचा उल्लेख माझे फिर्यादमध्ये, नोटीसमध्ये व शपथपत्रामध्ये नाही.

**०४.** हे मला माहीत नाही की, १ एप्रिल २०१७ रोजी हैद्राबाद बॅक इंडीया बॅकेत विलीन झाली. हे खरे आहे की, मी आरोपीला पैसे कोठे दिले याचा उल्लेख माझे फिर्यादमध्ये, नोटीसमध्ये व शपथपत्रामध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे नोटीसमध्ये टाकलेला आरोपीचा खाते क्रमांक व माझे फिर्यादमधील खाते क्रमांक वेगवेगळा आहे. नोटीसमधील आरोपीचा खाते क्र. ६५००९५००७२९ असा आहे तर फिर्यादमधील आरोपीचा खाते क्र. ६२००९५००७२९ असा आहे. हे खरे आहे की, दोन्ही खाते क्रमांक वेगवेगळे आहेत. हे खरे नाही की, आरोपीने दिलेल्या उत्तरात त्याचा नमदु असलेला खाते क्रमांक पाहुन मी फिर्याद व प्रतिज्ञापत्रात आरोपीचा खाते क्रमांक नमुद केलेला आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, धनादेशावर पाहुन मी आरोपीचा खाते क्रमांक नमुद केलेला आहे.

**०५.** हे खरे आहे की, माझे वडील पाटबंधारे विभागात लिपीक म्हणून नोकरीस होते व ते सन २०१२ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. सन २०१२ मध्ये ते निवृत्त झाल्यानंतर त्यांना निवृत्तीवेतन साधारण र.रू. २५,०००/- मिळत होते. माझे वडीलांचे ऑफीस बडा हनुमान

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.10.10 01:22:01 +0530

मंदीरासमोर होते. हे मला सांगता येणार नाही की, डिघोळ पाटी येथे केज अंबाजोगाई रोडवर परभणी कृषी विदयापीठ अंतर्गत सिताफळ संशोधन केंद्र आहे. आरोपी हा मुळ नांदेड जिल्हयातील आहे. हे मला माहीत नाही की, आरोपी बालाजी यांचे दोन्ही मुले कमावते आहेत. हे मला माहीत नाही की, आरोपीची दोन्ही मुले कमावती असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थीती चांगली आहे. हे खरे आहे की, सन २०१७ मध्ये आरोपीला दिलेली एवढी मोठी रक्कम कोठुन आणली याचा उल्लेख माझे फिर्यादमध्ये, नोटीसमध्ये व पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सदरची रक्कम ही माझे आईवडीलांच्या नोकरी व पेंशनच्या पैशातून आरोपीला दिलेली आहे. हे खरे आहे की, सन २०१७ सालात मला उत्पन्नाचे साधन नसल्याबाबत मी माझे फिर्यादमध्ये, नोटीसमध्ये व पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नमुद केलेले नाही. आरोपी व माझेमध्ये कधीही या व्यवहाराव्यतीरीक्त इतर कोणताही व्यवहार झालेला नाही.

**०६.** मी अंबाजोगाई न्यायालयात कलम १३८ प्रमाणे संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २७९/२०२०, २७८/२०२०, २७०/२०२०,२६३/२०२०, २६६/२०२०, ३२/२०१९, ४६६/२०२२, १९०/२०२५ असे वेगवेगळया लोकांविरूध्द दाखल केलेले आहेत. माझे आईचे नाव आशा घनश्याम घोबाळे असे आहे. आरोपीचे माझे आईसोबत देखील आर्थीक उसनवारी व्यवहार झालेले आहेत. हे खरे आहे की, दिनांक २०.०१.२०२१ रोजी माझेवर व माझे वडीलांवर अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे येथे सावकारकीचा गुन्हा दाखल झालेला आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे व दिवाणी वादातुन निर्माण झालेले आहे. हे खरे आहे की, सहाय्यक दुयम निबंधक सहकारी संस्था नितीन नरहरी पंडीत यांनी माझे विरूध्द फिर्याद दाखल केलेली आहे. हे खरे आहे की, सदर फिर्यादीनंतर सहाय्यक दुयम निबंधक सहकारी संस्था नितीन नरहरी पंडीत यांनी माझे घरावर छापा टाकला असता माझे घरातुन कोरे धनादेश, कोरे बॉन्ड व इतर काही कागदपत्रे सावकारीच्या कारणावरून पंचनामा करून जप्त केलेली होती व ती त्यानंतर न्यायालयात दाखल केली आहेत. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. हे खरे आहे की, सदरचा गुन्हा हा माझेवर व माझे वडीलांवर दाखल झालेला आहे. हे खरे आहे की, सहाय्यक दुयम निबंधक सहकारी संस्था नितीन नरहरी पंडीत यांनी आमच्या घरातुन जप्त केलेल्या कागदपत्रांमध्ये आरोपी बालाजी शिंदे यांचे देखील कागदपत्रे होते. हे खरे आहे की, कुंडगर यांचे देखील कागदपत्रे त्यावेळी जप्त केली होती व त्यांच्या विरूध्दची कलम १३८ ची

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.10.10 01:22:08 +0530

केस याच न्यायालयात प्रलंबित आहे. हे मला माहीत नाही की, आरोपीला सन २०१५ मध्ये माझे वडीलांनी र.रू. १,२५,०००/– व्याजाने पैसे दिल्याचा कागद सुध्दा सहाय्यक दुयम निबंधक सहकारी संस्था नितीन नरहरी पंडीत यांनी जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ मध्ये आरोपीने माझे वडीलांकडून व्याजाने घेतलेले पैशांचा पुर्ण हिशोब करून व्याजासह पूर्ण पैशांची परतफेड केली होती व त्या कागदावर माझी व माझे वडीलांची सही आहे. हे मला माहीत नाही की, आरोपीने माझे वडीलांकडून सन २०१०–११ मध्ये व्याजाने घेतलेले पैसे २०१५ मध्ये पूर्णपणे परतफेड केले होते. हे मला माहीत नाही की, आरोपीने माझे वडीलांकडून व्याजाने पैसे घेतले तेव्हा माझे वडीलांनी आरोपीचे पूर्ण चेकबूक सेक्युरीटी म्हणून ठेवून घेतलेले होते व त्या चेकबूकची सिरीज २०१०२१ पासून चालु झालेली होती. सदर सिरीमधील चेक दिनांक ०४.१२.२०१०, चेक नं. २०१०२२, दिनांक २३.०७.२०११, चेक नं. २०१०२६, दिनांक ०९.०८.२०११ चा चेक नं. २०१०२४, दिनांक ०७.०९.२०११ चा चेक नं. २०१०२७,दिनांक १३.१०.२०११ चा चेक नं. २०१०२८ अशा सिरीजचे धनादेश आम्ही वटवलेले आहेत. हे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील धनादेश देखील त्याच सिरीजमधील आहे. हे मला माहीत नाही की, आरोपीच्या खात्यामधून माझे आईच्या खात्यामध्ये सन २०१० ते सन २०१६ मध्ये र.रू. १,६०,३००/– वर्ग झालेले आहेत. हे मला माहीत नाही की, आरोपीने माझे वडीलांकडून व्याजाने घेतलेले पैसे माझे व माझे आईच्या खात्यावर पाठवून र.रू. १,६०,३००/– अशी पाठवून व्यवहार पूर्ण केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने सदरच्या व्यवहारापोटी हमी म्हणून माझे वडीलांना सन २०१०–११ मध्ये दिलेले चेकबूकचा गैरवापर करून आरोपीविरूध्द प्रस्तुतची खोटी केस मी दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझेकडन कधीही पैसे घेतलेले नाहीत किंवा मला त्याने कधीही धनादेश दिलेला नाही किंवा आरोपी माझे कोणतेही देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेविरूध्द सावकारकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर मी सदरचे प्रकरण आरोपीविरूध्द दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेब्रुवारी–२०२० मध्ये कोरोना रोगाच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण भारतात लॉकडाउन होते. माझे वडील २१ जुलै २०२३ मध्ये मयत झाले आहेत. माझे वडील कर्करोगामुळे मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे कसलेही देणे लागत नाही किंवा मला त्याने धनादेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांकडे

Digitally signed by
SONTAKKE
MAHAVIR BALIRAM
Date: 2025.10.10
01:22:15 +0530

सेक्युरेटीपोटी ठेवलेल्या धनादेशाचा गैरवापर करून आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक –०९/१०/२०२५

समक्ष,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.10.10 01:22:23 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.10.10 01:22:27 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.